# राष्ट्रीय आरोग्य अभियान,
# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सातारा

## दि. १९-०१-२०२२ रोजी समुदाय आरोग्य अधिकारी या पदावर समुपदेशन प्रक्रियेद्वारे नियुक्ती आदेश निर्गमित करणेकरीता उमेदवारांना सुचना

**"समुपदेशनासाठी फक्त उमेदवारांनाच सभागृहात प्रवेश दिला जाईल"**

१) **समुपदेशन प्रक्रियेमध्ये उमेदवारांना समान गुण असलेस खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत येणार आहे**

अ) प्रथम उमेदवारांची शैक्षणिक अर्हता ग्राहय धरणेत आली आहे. (बीएएमएस प्रथम व त्यानंतर बीएससी नर्सिंग)

आ) समान गुणांवर एकच पदवी असलेला उमेदवार असल्यास त्यांच्या जन्मतारीखेचा विचार करणेत आलेला आहे.

२) यादीतील उमेदवारांनी समुपदेशन प्रक्रियेकरीता **बुधवार दि. १९-०१-२०२२ रोजी छत्रपती शिवाजी सभागृह, ४ था मजला, जिल्हा परिषद, सातारा** येथे सकाळी ठिक ०९.३० वाजता उपस्थित रहावे, येताना आपले एक्झिट एक्झाम उत्तीर्ण झालेली मार्कशीटची एक प्रत आणावी.

३) उमेवारांनी आलेनंतर प्रथमत: आपली हजेरी नोंदवुन अचुक माहिती भरावी.

४) समुपदेशन प्रक्रिये दरम्यान आपल्याला पसंतीनुसार उपकेंद्र निवडायचे आहे व त्यासाठी रिक्त उपकेंद्राची यादी सभागृहाबाहेर त्याच दिवशी लावणेत येईल.

५) समुपदेशन प्रक्रियेदरम्यान आपणांस आपल्या इच्छेनुसार उपकेंद्र न मिळालेस प्रक्रियेतुन बाहेर पडुन समक्ष नकारपत्र भरुन द्यावयाचे आहे. नकारपत्र सादर करताना आपल्या प्रशिक्षणासाठी झालेल्या खर्चाची दंडात्मक रक्कम रु.१,०३,०००/- वसुल करणेची कार्यवाही करणेत येईल.

६) रुजू झाल्यानंतर रुजू अहवाल आणि विहीत नमुन्यातील करारपत्र (रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर) भरुन तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा आपले मानधन अदा करण्यात येणार नाही.

७) समुपदेशन प्रक्रियेदरम्यान सर्वानी कोविड-१९ च्या साथरोग परिस्थितीच्या अनुषंगाने सामाजिक अंतर, मास्क वापरणे, सॅनिटायझरचा वापर याबाबींचा काटेकोरपणे पालन करावे

Scanned by CamScanner